साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

तुमच्या बॉर्न बेबीची काळजी तुमच्याप्रमाणे आम्हालाही
नवजात बाळासाठी सर्व काही इथेच...
आता पुण्यात सुद्धा..
। स्वेटर । जॅकेट । झबले । टोपी । लंगोट । गादी ।
। मच्छरदाणी । बेडी । कॅप । टॉवेल । कपाट ।
। प्लास्टीक ड्रायशिट । सॉक्स । हातमोजे व बरेच काही.
जरीवाला
कापड बाजार, नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २३.०७.२०२६ | अंक नं. ०९७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

रु. 2000 पासुन बेबी टॉप्स / 1000 पेक्षाही अधिक डिझाईन्स
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ ९९९/-*
Conditions Apply*

CAMEL SAGO
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

# दिल्लीतील विद्यार्थी आंदोलन दडपशाहीविरोधात अण्णा हजारे मैदानात

## अहिल्यानगरमध्ये महात्मा गांधी पुतळ्यासमोर केले 'मौन धरणे आंदोलन'; विद्यार्थ्यांसह नागरिकांचाही सहभाग, 'दडपशाही नव्हे संवाद हवा'चे झळकले बॅनर

नगर – दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत सरकारकडून संवाद साधण्याऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जात असल्याबद्दल चिंता व्यक्त करत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या उपस्थितीत नगरमध्ये २३ जुलै रोजी वाडिया पार्क येथील महात्मा गांधी पुतळ्याजवळ मौन धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विद्यार्थ्यांसह नागरिकांनी सहभाग घेतला.

वाडिया पार्क येथील महात्मा गांधी स्मारकाजवळ करण्यात आलेल्या आंदोलनस्थळाला नगरचे जंतरमंतर असे प्रतिकात्मक नाव देण्यात आले होते.

दिल्ली येथील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या परिस्थितीत लोकशाही मूल्यांचे संरक्षण, विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत संवेदनशीलता आणि संवादातून मार्ग काढण्याची गरज अधोरेखित करण्यासाठी हे मौन धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. आंदोलनातून दडपशाही नव्हे, संवाद हवा, विद्यार्थ्यांना न्याय मिळाला पाहिजे आणि लोकशाही व संविधानाचे रक्षण झाले पाहिजे, असा संदेश देणारे बॅनर लावण्यात आले होते.

या आंदोलनात विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिकांनी सहभाग नोंदविला. आंदोलनाच्या आयोजनात अ‍ॅड. श्याम आसावा, अशोक सब्बन, विकास सुतार, संदीप कुसळकर, नंदाताई पांडुळे, तुलसीबाई पालीवाल, सतीश कांबळे आणि संतोष धर्माधिकारी यांनी पुढाकार घेतला.




दिल्लीतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी नगरमध्ये मौन आंदोलन केले. या आंदोलनात सहभागी झालेले विद्यार्थी व नागरिक.

SK Melody Present's
एक दिल दो आवाज़
Singer - Kiran Ujagare, Pawan Firodiya, Sameer Khan, Sarang Pandhade, Ester Pawar, Mohsin Saifi, Neha Ostwal
Anchor - Dr. Prajkta Savedkar
- Music Arranger - Nilesh Sojwal, Aman Sayyad, Adwin Perepadam
The Legends of Indian Cinema
Mohammad Rafi & Kishor Kumar
Organiser
Sameer Khan I Kiran Ujagare
First Come First Entry | प्रवेश विनामूल्य | 7020681422
शुक्रवार दि. २४ जुलै २०२६ रोजी ६.०० वा.
स्थळ - माऊली संकुल, झोपडी कॅन्टीन सावेडी. अ.नगर.

# नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ 'भिंगार शहर बंद'

## वंचित बहुजन आघाडीचे आंदोलन; विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जचा निषेध



नीट पेपरफुटी, शिक्षणातील भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ भिंगार शहर बंद आंदोलनावेळी व्यापाऱ्यांना आवाहन करताना वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी.

नगर – नीट परीक्षा पेपरफुटी, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार तसेच दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भिंगार शहरातील विविध भागांत बंद पाळण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी व्यापाऱ्यांना शांततेच्या मार्गाने दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले.

राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली व पक्षाच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. नीट परीक्षा पेपरफुटी, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी दिल्लीतील जंतर-मंतर व संसदेसमोर देशभरातील विद्यार्थी, युवक व पालकांनी शांततापूर्ण आंदोलन केले होते. मात्र या आंदोलनाकडे दुर्लक्ष करून आंदोलकांवर पोलिसांकडून लाठीचार्ज करण्यात आल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.

या कारवाईत अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचा तसेच काही आंदोलकांना अटक करून त्यांच्याशी गैरवर्तन करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेली कारवाई निषेधार्ह असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी सरकारने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष हनिफ शेख, जिल्हाध्यक्ष योगेश साठे, युवा जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलुमे, युवा जिल्हा उपाध्यक्ष दीपक ससाणे, प्रवीण ओरे, सुहास धीवर, सुरेश पानपाटील, देविदास भालेराव, सुधीर धामणे, अ‍ॅड. योगेश गुंजाळ, कर्जत तालुकाध्यक्ष पोपट शेटे, चंद्रकांत नेटके, अंकुश साळवे, जीवन कांबळे, संकेत शिंदे, प्रतीक ठोकळ, संजय शेलार, राजीव भिंगारदिवे, अमर निरभवने, बाजीराव राजगुरु, संध्या मेढे, अविनाश साठे, आढाव यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com
बालरोग मोफत तपासणी शिबीर
शुक्रवार दि. २४-०७-२०२६ * वेळ : सकाळी १० ते २
तज्ञ डॉक्टर
डॉ. निखीलकुमार गुट्टे | डॉ. सचिन तोडमल
डॉ. रुपेश सिकची | डॉ. वैभवी वंजारे
डॉ. दिपी अग्रवाल
- २६ बेडचे एन.आय.सी.यू. अद्ययावत रुग्णालय..
- नवजात बाळाच्या श्वासोच्छवासाच्या होणाऱ्या त्रासावर उपचार
- बालदमा ए.आर.डी.एस. (श्वसनदाह), नवजात कावीळसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा.
- अनुवंशिक आजार व जन्मजात आजारावर निदान.
- बालदमा तसेच लहान मुलांचे टु-डी इको, एक्स-रे, पॅथोलॉजी लॅब २४ तास उपलब्ध.
- आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीचे मशिन्स् उपलब्ध..
- २४ तास तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध.
- महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया केले जातील.
सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया
सरकमसीजन (सुंता) 7500/- | हायड्रोसील 12700/- | ॲपेंडीक्स 14500/-
जांघेचा हर्निया 14000/- | बेंबीचा हर्निया 10650/-
* औषधाचा खर्च वेगळा लागेल.
* सोनोग्राफी, रक्त, लघवी इ. तपासण्या ५०% सवलतीच्या दरात केल्या जातील.
एम.आर.आय. रू. 2500/- | रात्री 1.00 ते पहाटे 5.00 या वेळेत एम.आर.आय. केल्यास रु. 750/- ची सुट | संपर्क : 9404297411
डिजिटल एक्सरे रू. 250/- | सोनोग्राफी रू. 950/- | संपर्क : 9405271878
सिटीस्कॅन रू. 1250/- संपर्क : 9404299911
24 तास ब्लड बँक
होम ब्लड सॅम्पल कलेक्शन मो. नं. 9373807842
हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

Become a COMPUTER PROFESSIONAL
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT
DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM
Enroll Now www.dishagroup.in
दिल्ली गेट शाखा 9371051769
जुने बस स्टँड शाखा 9371151769
पाईपलाईन शाखा 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचा अण्णा हजारे यांच्या मौन आंदोलनाला पाठिंबा

नगर – दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनार्थ तसेच लोकशाहीतील सनदशीर मार्गाचे जतन करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर येथे सुरू असलेल्या मौन धरणे आंदोलनाला राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र राज्य (शाखा अहिल्यानगर) यांनी पाठिंबा जाहीर केला आहे.


यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष तळेकर, जिल्हा सरचिटणीस रावसाहेब निमसे, वरिष्ठ उपाध्यक्ष विलास पेद्राम, पुरुषोत्तम आडेप, भागवत नवगण तसेच उपाध्यक्ष अशोक मासाळ यांनी संयुक्त निवेदनाद्वारे लोकशाही व्यवस्थेत शांततापूर्ण आणि अहिंसक मार्गाने मागण्या मांडणे हा प्रत्येक नागरिकाला संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार असल्याचे नमूद केले आहे.

पत्रकात म्हटले आहे की, सरकारी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर संघटना नेहमीच ठामपणे उभी राहिली असून ज्येष्ठ नेते रावसाहेब निमसे आणि विलास पेद्राम यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना सत्य, न्याय आणि लोकशाही मूल्यांच्या बाजूने सातत्याने भूमिका घेत आली आहे. आंदोलनात ॲड. श्याम आसावा यांच्या सहभागामुळे आंदोलनाला वैचारिक बळ मिळत असून कायद्याच्या चौकटीत राहून, अभ्यासपूर्ण आणि संयमी पद्धतीने उभारलेला लढा कधीही अपयशी ठरत नसल्याचा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाशर्ती आणि प्रशासकीय मर्यादांचे काटेकोर पालन करतानाच सुजाण नागरिक म्हणून संविधान आणि जनसामान्यांच्या पाठीशी उभे राहणे ही काळाची गरज असल्याचेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील शासकीय कर्मचारी अण्णा हजारे आणि त्यांच्या नेतृत्वाखाली शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष तळेकर, जिल्हा सरचिटणीस रावसाहेब निमसे, वरिष्ठ उपाध्यक्ष विलास पेद्राम, भाऊसाहेब शिंदे, पुरुषोत्तम आडेप, भागवत नवगण, उपाध्यक्ष अशोक मासाळ यांच्यासह राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## निवृत्त प्राचार्य शरदराव माणकेश्वर यांचे निधन

नगर – शहरातील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, निवृत्त प्राचार्य तथा अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या विविध शैक्षणिक संस्थांमध्ये दीर्घकाळ सेवा बजावलेले शरदराव दत्तात्रय माणकेश्वर (वय ८७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने नगरच्या शैक्षणिक क्षेत्रावर शोककळा पसरली असून, शिक्षण क्षेत्रातील एक अभ्यासू, कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थीप्रिय व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना विविध मान्यवरांनी व्यक्त केली.



शरदराव माणकेश्वर यांनी सन १९६० मध्ये अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये नॉन–टीचिंग स्टाफ म्हणून आपल्या सेवेला प्रारंभ केला. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची ओढ कायम ठेवत त्यांनी बाह्य शिक्षणाद्वारे स्वतःचे उच्च शिक्षण पूर्ण केले. आपल्या मेहनत, जिद्द आणि गुणवत्तेच्या बळावर त्यांनी संस्थेतील विविध पदांवर जबाबदाऱ्या सांभाळल्या. शिक्षण क्षेत्रातील प्रामाणिक कार्याची दखल घेत त्यांची पुढे बी.एड. महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती झाली. आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त आणि विद्यार्थीकेंद्री शिक्षणपद्धतीचा सातत्याने पुरस्कार केला.

त्यांच्या पार्थिवावर विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षणप्रेमी, माजी विद्यार्थी, सहकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सुन, जावई, नातवंडे, पंतू असा मोठा परिवार आहे.

## रेल्वे अपघातात अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

नगर – रेल्वे अपघातात गंभीर जखमी झालेल्या एका अंदाजे ४० वर्षीय अनोळखी पुरुषाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची घटना २२ जुलै रोजी सायंकाळी घडली आहे. या प्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

२२ जुलै रोजी सायंकाळी निंबळक शिवारात रेल्वे अपघातात एक अनोळखी व्यक्ती गंभीर जखमी झाली होती. जखमी अवस्थेत त्याला तातडीने नगर येथील सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. चव्हाण यांनी तपासून औषधोपचारापूर्वीच त्या व्यक्तीस मृत घोषित केले.

मृत व्यक्तीचे अंदाजे ४० वर्षे असून या प्रकरणी अधिक तपास पोलीस हवालदार चौधरी हे करत आहेत. मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी किंवा या घटनेबाबत अधिक माहिती असल्यास नागरिकांनी तपासी अधिकारी पो.हे.कॉ. चौधरी मो. ९०११६६६१०० यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# २ मजुरांना मारहाण करत रोकड, मोबाईल आणि चांदीची चेन लुटली

### केडगाव येथील लिंक रोडवरील घटना, रिक्षाचालकावर गुन्हा दाखल

नगर – केडगाव परिसरातील लिंक रोडवर एका निर्जन स्थळी अनोळखी रिक्षाचालकाने दोन मजुरांना बेदम मारहाण करत लुटल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेत रोख रकमेसह मोबाईल व चांदीची चेन असा एकूण ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावून पोबारा केला. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शाहूनगर (केडगाव) येथे राहणारे गवंडी कामगार बादल भारत रामरज्ञत आणि त्यांचे मित्र गुन्हागार राम निषाद हे दोघे २१ जुलैच्या रात्री दहा वाजेच्या सुमारास लिंक रोडने जात होते. त्यावेळी एका अनोळखी रिक्षाचालकाने आपली रिक्षा एका निर्जन ठिकाणी थांबवली. त्यानंतर त्याने बादल रामरज्ञत आणि गुन्हागार निषाद या दोघांशी वाद घालत त्यांना शिवीगाळ केली.

रिक्षाचालकाने दोघांनाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली. यानंतर त्याने बादल यांच्या जवळील १० हजार रुपये रोख आणि मोबाईल, तर गुन्हागार निषाद यांच्या जवळील ११ हजार रुपये रोख, ९ हजार ५०० रुपये किंमतीची चांदीची चेन आणि ८ हजार रुपयांचा मोबाईल असा एकूण ३९ हजार रुपयांचा ऐवज काढून घेतला व तेथून पळ काढला.

घटनेनंतर पीडितांनी कोतवाली पोलीस ठाण्यात जाऊन आपबीती सांगितली. बादल रामरज्ञत यांच्या फिर्यादीवरून पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

# माळीवाडा परिसरात वृद्धाला लोखंडी गजाने मारहाण करत सोन्याचा बदाम व रोकड लुटली

### ६ जणांवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – शहरातील माळीवाडा भागातील ब्राम्हण गल्लीमध्ये एका ७२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला बेदम मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोन्याचा बदाम व रोख रक्कम लुटल्याची घटना २१ जुलै रोजी रात्री घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत केरप्पा रामचंद्र हुच्चे (वय ७२, रा. ब्राम्हण गल्ली, माळीवाडा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २१ जुलै रोजी रात्री आपल्या घरी असताना, मध्यरात्री १२ ते १२:३० वाजण्याच्या सुमारास काही तरुण त्यांच्या घरासमोर उभे राहून जोरात आरडाओरडा व शिवीगाळ करत होते. घराबाहेर अचानक सुरू असलेला गोंधळ ऐकून केरप्पा हुच्चे हे नक्की काय प्रकार घडला आहे हे पाहण्यासाठी घराबाहेर आले. त्यांनी तरुणांना शिवीगाळ न करण्याबाबत विचारणा केली.

याचा राग धरून टोळक्यातील आरोपी कृष्णा भागानगरे, ओंकार घोलप, शिवम घोलप, भय्या बिडकर, आदित्य करमाळकर आणि दर्शन बोरा यांनी फिर्यादी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादी यांच्यावर लोखंडी गजाने प्राणघातक हल्ला करून त्यांना जबर मारहाण केली. मारहाणीदरम्यान आरोपींनी हुच्चे यांच्या गळ्यातील साडेतीन ग्रॅम वजनाचा सोन्याचा बदाम आणि खिशातील ३५० रुपयांची रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली व तेथून पळ काढला. या घटनेनंतर पीडित ज्येष्ठ नागरिकाने कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली.

त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# अल्पवयीन विद्यार्थिनीचा सोशल मीडियाद्वारे त्रास देत विनयभंग

### पाठलाग करत जीवे मारण्याचीही दिली धमकी; तरुणावर गुन्हा दाखल

नगर – सोशल मीडियावरून अल्पवयीन विद्यार्थिनीशी (वय १४) ओळख वाढवून अश्लील मेसेज पाठवणे, तिचा पाठलाग करणे, घरासमोर येऊन त्रास देणे आणि नंतर तक्रार केल्यानंतरही धमकावल्याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी एका तरुणाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पीडित मुलीने २२ जुलै रोजी फिर्याद दिली आहे. अभिषेक तारू असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मुलगी शहरातील हायस्कूलमध्ये शिक्षण घेत आहे. तिच्या आईच्या इन्स्टाग्राम खात्यावर अभिषेक याने फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून ओळख करून घेतली.

सुरुवातीला मेसेज पाठवल्यानंतर त्याने मुलीला व्हिडिओ कॉल करण्याचा आग्रह धरला. तिने प्रतिसाद देणे बंद केल्यानंतर संशयिताने तिच्या घरासमोर येऊन दरवाजा ठोठावला. त्यानंतर इन्स्टाग्रामवर मेसेज पाठवले. पुढे त्याने अश्लील आणि लज्जास्पद मेसेजांचा भडिमार केल्याचा फिर्यादीत उल्लेख आहे. या प्रकारामुळे मुलगी घाबरून गेली होती. त्यानंतर ती शाळेत ये–जा करत असताना संशयित तिचा सातत्याने पाठलाग करू लागला. यानंतर २१ जून रोजी मुलीच्या आईने संशयिताच्या घरी जाऊन त्याच्या आई–वडिलांकडे तक्रार केली. तसेच घरमालकांनीही त्याला समज दिली होती. मात्र त्यानंतरही त्याच्या वर्तनात कोणताही बदल झाला नाही. २१ जुलै रोजी रात्री संशयिताच्या नातेवाईकांशी चर्चा सुरू असतान अभिषेक तेथे आला. त्यावेळी त्याने, मी सहा महिने जेल काढून येईल, तुम्हाला काय करायचे ते करा. मी कोणालाही घाबरता नाही, तुम्हाला पाहून घेईन, अशी धमकी देत विद्यार्थिनीच्या आईला शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

## कलावतीबाई वाकळे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – येथील वाकळे वस्ती बोल्हेगाव येथील रहिवासी श्रीमती कलावतीबाई फकिरा वाकळे (वय ८५) यांचे २२ जुलै रोजी वृध्दपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. स्व. आ. शिवाजीराव कर्डिले यांच्या त्या मोठ्या बहिण तर आ. अक्षय कर्डिले यांच्या आत्या होत.



## शांताबाई देसाई यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – साबलखेड येथील रहिवासी श्रीमती शांबाबाई नामदेव देसाई (वय ९२) यांचे २१ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर साबलखेड अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, ४ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. आबा, महादेव यांच्या त्या मातोश्री होत.

## कलावतीबाई बोरा यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – गंगापूर येथील रहिवासी श्रीमती कलावतीबाई मिलापचंद बोरा (दहिगाववाला) (वय ८२) यांचे २३ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नितीन मशनरीवालाचे दिलीप बोरा यांच्या आई तर राजेंद्र, प्रदीप, मर्चंट बँकेचे संचालक संजय बोरा यांच्या त्या काकू होत.

## पुष्पांजलीबाई शिर्के यांचे दु:खद निधन

नगर – बाबुर्डी येथील रहिवासी व जिल्हा परिषदेतील शिक्षिका सौ. पुष्पांजलीताई प्रमोद शिर्के (वय ४३) यांचे २२ जुलै रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बाबुर्डी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पती, १ मुलगा, २ मुली असा परिवार आहे. प्रमोद शिर्के यांच्या त्या पत्नी होत.

## अण्णासाहेब दौंड यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर – येथील नवशक्ती चौक मोरगे वस्ती वॉर्ड ७ येथील रहिवासी ह.भ.प. अण्णासाहेब खंडेराव दौंड (वय ७९) यांचे २३ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २३ जुलै रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, ५ मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रुचि मसालाचे होलसेल व्यापारी मधुसूदन व नामदेव (अनंत) दौंड यांचे ते वडील होत.



# माऊली संकुलला महानगरपालिकेची नोटीस, रस्त्यावर ठेवलेले जनरेटर हटविण्याचे आदेश

नगर – सावेडीतील झोपडी कॅन्टीनजवळील तलाठी महासंघाच्या माऊली संकुलला म हापालिकेने नोटीस बजावून कारवाईचा इशारा दिला आहे. माऊली संकुलातील विद्युत व्यवस्थेसाठी घेतलेले जनरेटर रस्त्याच्या कडेला मांडण्यात आले आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना आणि वाहनांना अडथळा ठरत आहे. त्यामुळे महापालिकेच्या जागेत मांडलेले हे जनरेटर तातडीने हटविण्यात यावे, अन्यथा महापालिकेच्या कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा या नोटीसद्वारे देण्यात आला आहे.

अहिल्यानगर महापालिकेच्या प्रभाग समिती क्र. १ कार्यालयाकडे माऊली व्यापारी संकुलाच्या जागेत सध्या बांधकाम सुरु आहे. त्यामुळे त्यांच्याकडील विद्युत व्यवस्थेसाठीचे जनरेटर रस्त्यावर ठेवल्याची तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर वरिष्ठांच्या सूचनेनुसार प्रभाग अधिकाऱ्यांनी स्थळ पाहणी केली असता संबंधित जनरेटर हे महापालिकेच्या जागेत असल्याचे आढळून आले. त्यामुळे महापालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयाच्यावतीने तलाठी महासंघ माऊली संकुलच्या अध्यक्षांना महापालिकेच्या जागेतील अतिक्रमित इलेक्ट्रिक जनरेटर तातडीने हटवण्याची नोटीस देण्यात आली आहे. माऊली संकुल या इमारतीचा विद्युत पुरवठा खंडित झाल्यानंतर वापरण्यात येणारे हे इलेक्ट्रिक जनरेटर महापालिकेच्या जागेत अतिक्रमण करून लावण्यात आले असल्याचे समक्ष स्थळ पाहणीदरम्यान निदर्शनास आले असल्याचे या नोटीसमध्ये म्हटले आहे. त्यानुसार, सदरचे अतिक्रमित जनरेटर महापालिकेच्या जागेतून तातडीने स्वतः हून हटवण्यात यावे, अन्यथा प्रशासनाकडून ते हटवण्यात येईल आणि त्यासाठी होणारा सर्व खर्च आपल्याकडून वसूल केला जाईल, असा इशारा प्रभाग अधिकाऱ्यांनी दिला आहे.

# महिलेवर व मुलावर कुऱ्हाडीने हल्ला करून मंगळसूत्र लांबवले

नगर – नगर तालुक्यातील देऊळगावसिद्धी येथे पूर्ववैमनस्यातून एका कुटुंबावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात दोघे जण गंभीर जखमी झाले असून, हल्लेखोरांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसूत्र तोडून पळ काढला. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अनिता शिवराम भोसले (वय ४०, रा.देऊळगावसिद्धी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. १८ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. श्रीमंत जीवलाल चव्हाण आणि अनिता श्रीमंत चव्हाण (दोघे रा. देऊळगावसिद्धी) यांनी जुन्या वादातून अनिता भोसले यांच्या घरासमोर जाऊन वाद घातला. वादाचे रूपांतर मारहाणीत होऊन आरोपींनी कुऱ्हाडीने थेट डोक्यात वार केले. या हल्ल्यात अनिता भोसले आणि त्यांचा मुलगा संकेत भोसले हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

हल्ल्यादरम्यान आरोपींनी लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण करत शिवीगाळ व दमदाटी केली. तसेच अनिता भोसले यांच्या गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसूत्र जबरदस्तीने तोडून नेले. या घटनेनंतर जखमींवर उपचार केल्यानंतर त्यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार गुंजाळ करत आहेत.

# हद्दपारीचा आदेश मोडून शहरात फिरणाऱ्या आरोपीवर गुन्हा दाखल

नगर – उपविभागीय दंडाधिकारी यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातून सहा महिन्यांसाठी हद्दपार केलेले असतानाही कोणतीही पूर्वपरवानगी न घेता शहरात मुक्तपणे वावरणाऱ्या एका आरोपीविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करण खंडु पाचारणे (वय ३२, रा. आदर्शनगर, नागापूर, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

उपविभागीय दंडाधिकारी अहिल्यानगर यांनी २९ एप्रिल २०२६ पासून आरोपी करण पाचारणे यास सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले होते. असे असतानाही, आरोपीने शासकीय आदेशाचा भंग केला आणि २२ जुलै रोजी सायंकाळी चार वाजेच्या सुमारास तो गांधीनगर, बोल्हेगाव परिसरात मुक्तपणे फिरताना आढळून आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला पकडले. याबाबत पो.कॉ. प्रकाश मांडगे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये हद्दपारीच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बलजिंदरसिंग सेठी यांचे दु:खद निधन

श्रीरामपूर – येथील बलजिंदरसिंग स्वराजसिंग सेठी (वय ८१) यांचे २३ जुलै रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे मरणोत्तर देहदान करण्यात आले.



ते अशोकनगर येथील सेठी किराणा दुकानचे मालक लकी (हरदिपसिंग), तेजिंदरसिंग व सुरेंद्रसिंग सेठी यांचे वडील, नगरसेविका नवनितकौर लकी सेठी यांचे सासरे होत. त्यांचा देहदानविधी २३ जुलै रोजी दुपारी १२ वा. स्वराज दशमेशनगर मॉडेल इंग्लिश स्कूल मागे, दशमेशनगर, वॉर्ड नं.१ श्रीरामपूर येथे करण्यात आला.

# कामरगाव येथील जुगार अड्ड्यावर छापा; ६ जण ताब्यात, ३.७० लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्यांविरोधात धडक कारवाई सत्र सुरूच ठेवले असून, कामरगाव (ता. नगर) शिवारामधील एका तिरट जुगार अड्ड्यावर छापा टाकला आहे. या कारवाईत पोलिसांनी ६ आरोपींना रंगेहात पकडले असून जुगाराचे साहित्य, मोबाईल आणि वाहनांसह एकूण ३ लाख ६९ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



कामरगाव (ता. नगर) शिवारामधील जुगार अड्ड्यावर छापा टाकून ६ जणांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला स्पष्ट निर्देश दिले होते. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उप.नि. कृष्णकुमार सेदवाड व त्यांच्या पथकाने नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त व माहिती काढण्यास सुरुवात केली.

गस्तीदरम्यान कामरगाव शिवारातील एका ताडपत्रीच्या शेडमध्ये काही इसम तिरट नावाचा पत्त्यांचा खेळ पैशांवर खेळत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. पथकाने तात्काळ पंचांसह घटनास्थळी जाऊन खात्री केली असता, त्या ठिकाणी काही जण जुगार खेळताना निष्पन्न झाले.

पोलीस पथकाला पाहताच एका आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी सतर्कता दाखवत ६ जणांना जागीच ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपींकडे चौकशी केली असता पळून गेलेल्या आरोपीचे नाव तसेच हा जुगार अड्डा कोण चालवत आहे, याची माहिती सांगितली. पोलीस सध्या या दोन्ही फरार आरोपींचा शोध घेत आहेत. या कारवाईत पोलिसांनी रोख रक्कम, मोबाईल, वाहने आणि जुगाराचे साहित्य असा एकूण ३ लाख ६९ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास नगर तालुका पोलीस करत आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. संतोष मुटकुळे, पो.उप.नि. कृष्णकुमार सेदवाड, पोलीस अंमलदार विष्णू भागवत, विजय पवार, सोमनाथ झांबरे, भीमराज खर्से, प्रकाश मांडगे व भगवान धुळे यांच्या पथकाने केली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### डोकेदुखीवर ठरेल त्वरित आराम

डोकेदुखी ही आजच्या धावपळीच्या जीवनशैलीतील एक सामान्य समस्या बनली आहे. ताण, अपुरी झोप, पाण्याची कमतरता आणि स्क्रीनचा जास्त वापर यामुळे ती वारंवार होते. पण घाबरू नका, काही सोपे घरगुती उपायांनी त्वरित आराम मिळू शकतो. डोकेदुखी झाल्यावर सर्वात आधी शरीराला हायड्रेट करा. एक-दोन ग्लास कोमट पाणी प्या. पाण्याअभावी डोकेदुखी होते असे तज्ज्ञ सांगतात. त्यानंतर शांत आणि अंधाऱ्या खोलीत १०-१५ मिनिटे डोळे बंद करून बसणे फायदेशीर ठरते. थंड किंवा गरम शेक हा रामबाण उपाय आहे. कपाळावर आणि मानेवर ओला टॉवेल ठेवा. ताणामुळे होणाऱ्या डोकेदुखीसाठी गरम शेक आणि सायनसच्या दुखण्यासाठी थंड शेक उपयुक्त ठरतो. यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि स्नायूंचा ताण कमी होतो. आयुर्वेदात पुदिना आणि आले यांना डोकेदुखीवर गुणकारी मानले आहे. पुदिन्याच्या तेलाने कपाळावर हलका मसाज करा किंवा आल्याचा चहा प्या. यातील नैसर्गिक घटक सूज कमी करतात आणि वेदना शांत करतात. कॅफीनची सवय असल्यास एक कप कॉफी किंवा चहा देखील त्वरित आराम देऊ शकतो. पण अति करू नका. महागड्या वेदनाशामक गोळ्यांपेक्षा हे सोपे, स्वस्त आणि आपल्या स्वयंपाकघरातले उपाय अधिक सुरक्षित ठरतात.

## पाककला

### पालक कॉर्न पनीर पराठा

**साहित्य :** गव्हाचे पीठ २ वाटी, बारीक चिरलेला पालक १ वाटी, उकडलेला गोड कॉर्न १/२ वाटी, किसलेले पनीर १/२ वाटी, बारीक चिरलेला कांदा १ लहान, बारीक चिरलेली मिरची १, १/२ चमचा जिरे पावडर, १/२ चमचा गरम मसाला, १/४ चमचा हळद, १/४ चमचा काळी मिरी पावडर, चवीनुसार मीठ, १ चमचा तेल, तळण्यासाठी तूप

**कृती :** प्रथम एका मोठ्या भांड्यात पीठ घ्या. त्यात चिरलेला पालक, कॉर्न, पनीर, कांदा, मिरची घाला. त्यात जिरे पावडर, गरम मसाला, हळद, काळी मिरी पावडर, मीठ आणि १ चमचा तेल घालून मिश्रण एकजीव करा. लागेल तसे थोडे पाणी घालून मऊसर कणिक मळून घ्या. १० मिनिटे झाकून ठेवा. कणकेचे समान गोळे करा. प्रत्येक गोळ्याची पोळी लाटा. तवा गरम करा. त्यावर पराठा ठेवून दोन्ही बाजूंनी हलका शेका. नंतर थोडे तूप लावा आणि दोन्ही बाजूंनी खरपूस आणि सोनेरी रंग येईपर्यंत भाजा. तयार गरमागरम पालक कॉर्न पनीर पराठा दही, लोणचे किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा. हेल्दी, पौष्टिक आणि लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना आवडणारी ही रेसिपी नक्की करून बघा

## वास्तू

### कौटुंबिक वाद कमी करण्यासाठी

घरातील प्रत्येक कोपऱ्याची एक ऊर्जा असते आणि ती थेट आपल्या नातेसंबंधावर परिणाम करते. जर घरात सतत वाद, गैरसमज आणि चिडचिड होत असेल तर काही छोटे वास्तू बदल नक्की करून बघा. सगळ्यात आधी घराचा नैऋत्य कोपरा बघा. हा कोपरा कुटुंबाचा पाया मानला जातो. इथे जड सामान, कपाट किंवा मास्टर बेडरूम असावी. नैऋत्य हलका किंवा रिकामा असेल तर नात्यात अस्थिरता येते. नवरा-बायकोनेही झोपताना डोके दक्षिण किंवा पूर्वेकडे ठेवावे. उत्तरेकडे डोके केल्याने रात्री झोप नीट लागत नाही आणि सकाळी चिडचिड वाढते. देवघर नेहमी ईशान्य कोपऱ्यात असावे. हा भाग पवित्र आणि हलका ठेवणे खूप गरजेचे आहे. इथे कचरा, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा टॉयलेट अजिबात नको. रोज सकाळी ईशान्येत दिवा लावल्याने घरातील नकारात्मकता कमी होते.

## सौंदर्य

आपण दिवसभरात नकळत २०० पेक्षा जास्त वेळा आपल्या चेहऱ्याला हात लावतो. आपल्या हातावर दिवसभरात हजारो प्रकारचे बॅक्टेरिया आणि घाण जमा होते. जेव्हा आपण चेहऱ्याला वारंवार हात लावतो तेव्हा बॅक्टेरिया थेट आपल्या त्वचेमध्ये जातात. त्यामुळे बंद ब्लॅकहेड्स आणि पांढरे मुरुम तयार होतात. यासाठी बाहेरून आल्यावर आणि जेवणापूर्वी साबणाने २० सेकंद हात धुवा. सॅनिटायझर सोबत ठेवा. खाज आली, घाम आला तर थेट हाताने न पुसता टिश्यू वापरा.

## सल्ला

पाणी जळक्या थराला मऊ करतं. लिंबामधील सायट्रिक ॲसिड हा नैसर्गिक क्लिनर आहे. तो चिकटलेली घाण आणि काळे डाग विरघळवतो. शिवाय लिंबामुळे भांड्यातील जळकट वासही निघून जातो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, अनुराधा २८।३७, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ७ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** महत्त्वाची कामे दुपारनंतर मार्गी लागतील.

**वृषभ :** वादविवाद होतील. खर्चाचे प्रमाण वाढेल.

**मिथुन :** वैवाहिक जीवनात सुसंवाद राहील. अनेकांचे सहकार्य लाभेल.

**कर्क :** कोणाच्याही सहकार्याची अपेक्षा नको. वेळ व पैसा वाया जाण्याची शक्यता.

**सिंह :** संततीचे प्रश्न मार्गी लागतील. शासकीय कामे मार्गी लागतील.

**कन्या :** कामानिमित्त प्रवास होतील. उत्साह वाढविणारी घटना घडेल.

**तूळ :** नोकरीत समाधानकारक स्थिती राहील.

**वृश्चिक :** जुनी येणी वसूल होतील. आर्थिक लाभ समाधानकारक राहील.

**धनु :** आरोग्य उत्तम राहील. मन आनंदी व आशावादी राहील.

**मकर :** कामाचा ताण व दगदग जाणवेल. महत्त्वाची कामे दुपारपूर्वी उरकतील.

**कुंभ :** अनेकांचे सहकार्य लाभेल. नवीन परिचय होतील.

**मीन :** कार्यक्षेत्रात मानसन्मान लाभेल. सामाजिक क्षेत्रात सहभागी व्हाल.

# फिल्मीचक्कर क्र. १२४६

सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | ■ | २ | ■ | ३ | | ४ |
| | ■ | ५ | ■ | ६ | | ■ | |
| ७ | | | | | | ■ | ■ |
| | ■ | | ■ | ■ | | ■ | ८ |
| ■ | ९ | ■ | १० | ■ | ११ | | |
| १२ | | ■ | १३ | | | ■ | |
| | ■ | ■ | | ■ | ■ | १४ | |
| १५ | | | | ■ | १६ | | |

**आडवे शब्द :-** १) धर्मेंद्र, माला सिन्हा यांचा एक गाजलेला चित्रपट २) + और मेरा हाथी (चित्रपटाचे नाव) ३) +++ जावेद (प्रसिद्ध संवाद लेखक) ६) एक फूल दो ++ (चित्रपटाचे नाव) ७) मिस्टर ++++++ (चित्रपटाचे नाव) ११) +++ करम (चित्रपटाचे नाव) १२) आ जा आ जा मैं हूं प्यार तेरा (गाणे) १३) +++ मिळे नवऱ्याला (मराठी चित्रपटाचे नाव) १४) गालावरची खळी तुझ्या लावी वेड मला काय सांगू तुला एक ++ दे (मराठी गाणे) १५) धर्मेंद्र, हेमामालिनी, प्रेम चोप्रा यांचा एक चित्रपट १६) +++ वाडकर (प्रसिद्ध गायक)

**उभे शब्द :-** १) मैं तुलसी तेरे ++++ (चित्रपटाचे नाव) ३) जुन्या काळातील एक संगीतकार ४) अमिताभ बच्चन, अमृतासिंग, निरुपा रॉय यांचा एक चित्रपट ५) +++ प्रेमाची (मराठी चित्रपटाचे नाव) ६) ++ सिन्हा (अभिनेत्रीचे नाव) ८) एक दिवंगत चरित्र अभिनेता ९) अरविंद स्वामी, मधू यांचा एक गाजलेला चित्रपट १०) या चित्रपटात संजीवकुमारने वेड्याची भूमिका निभावली आहे १२) राज कपूर, नर्गिस यांचा एक गाजलेला चित्रपट १४) ++ छम छम बाजे पायलीया (गाणे)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** शांत मन आणि मेहनती हात यांच्यापुढे नशिबालाही झुकावं लागतं.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मोबाईलमध्ये आवाज एका देशातून दुसऱ्या देशात सेकंदात कसा पोहोचतो?

एकविसाव्या शतकात मोबाईल हा फक्त फोन राहिला नाही. आता त्यातून आपण अमेरिकेतल्या आजीशी बोलतो, जपानमधल्या मित्राला व्हिडिओ कॉल करतो आणि तेही फक्त १-२ सेकंदात. पण हा आवाज एवढ्या लांब क्षणात कसा पोहोचतो हा खरा प्रश्न आहे.सर्वात महत्वाचे कारण म्हणजे मोबाईलचा आवाज आता तारेतून जात नाही. आपण बोलतो तेव्हा मोबाईल आपला आवाज आधी डिजिटल सिग्नलमध्ये बदलतो. म्हणजे ० आणि १ च्या भाषेत. हा डिजिटल आवाज प्रकाशाच्या वेगाने प्रवास करतो.पहिला टप्पा - टॉवर. आपला आवाज सर्वात जवळच्या मोबाईल टॉवरला रेडिओ लहरींनी जातो. टॉवरवरून तो कंपनीच्या फायबर केबलमध्ये टाकला जातो. या फायबर केबल्स जमिनीखाली आणि समुद्राखालून जगभर पसरलेल्या आहेत. त्यातून डेटा प्रकाशाच्या वेगाने धावतो. भारतातून अमेरिकेपर्यंत पोहोचायला त्याला ०.२ सेकंदही लागत नाहीत.

दुसरा टप्पा - सॅटेलाइट आणि इंटरनेट. काही कॉल्स सॅटेलाइटमार्फतही जातात. पण आजकाल जास्तीत जास्त कॉल्स इंटरनेट आणि समुद्रातील ऑप्टिकल फायबर केबल्स वापरतात. या केबल्स केसाएवढ्या पातळ असतात पण त्यातून एकाच वेळी लाखो लोकांचे कॉल्स जाऊ शकतात.तिसरा टप्पा - परत आवाज. समोरच्या देशातील टॉवरला सिग्नल मिळाला की तो पुन्हा तुमच्या मित्राच्या मोबाईलमध्ये जातो. तिथे मोबाईल तो ० आणि १ चा डेटा परत आवाजात बदलतो. म्हणून आपल्याला वाटते की आपण समोरासमोरच बोलतोय.अनेकदा नेटवर्क स्लो होते तेव्हा हा आवाज जरा उशिरा पोहोचतो. याला लॅग म्हणतात. कारण एकाच वेळी खूप लोक कॉल करत असतील किंवा फायबर केबलमध्ये अडथळा आला असेल. थोडक्यात, मोबाईलमधील आवाज हा जादू नाही. तो विज्ञान आहे.

आपला आवाज डिजिटल सिग्नल रेडिओ लहरी फायबर केबल परत आवाज. या ४ स्टेप्स प्रकाशाच्या वेगाने होतात म्हणून एका देशातून दुसऱ्या देशात बोलणे एवढे सोपे झाले आहे.आज जे अशक्य वाटायचे ते विज्ञानामुळे शक्य झाले. आणि उद्या अजून काय होईल याचा विचार केला तरी अंगावर रोमांच उभे राहतात.

### चिमणी आणि विहीर

चतुर चित्रकार आणि राजा

एका राज्यात एक राजा होता, ज्याला चित्रांची खूप आवड होती. त्याने राज्यात एक स्पर्धा जाहीर केली: जो कोणी 'शांतता' या विषयावर सर्वात सुंदर चित्र काढेल, त्याला बक्षीस दिले जाईल.

अनेक चित्रकारांनी आपली चित्रे आणली. कोणाचे चित्र म्हणजे निसर्गरम्य धबधबा होते, तर कोणाचे चित्र शांत समुद्राचे होते. राजा एका चित्राकडे आकर्षित झाला. त्या चित्रात एक प्रचंड वादळ होते, पाऊस पडत होता, झाडे वाकली होती आणि वीज चमकत होती. राजाला प्रश्न पडला की, यात शांतता कोठे आहे?

त्याने चित्रकाराला विचारले. चित्रकाराने राजाला चित्र नीट पाहायला सांगितले. राजाने बारकाईने पाहिले, तर त्या वादळी वातावरणात, एका खडकाच्या कपारीत एक छोटी चिमणी शांतपणे आपल्या घरट्यात बसून पिल्लांना ऊब देत होती.

चित्रकार म्हणाला, महाराज, शांतता म्हणजे गोंधळ नसणे नव्हे. शांतता म्हणजे सर्व बाजूंनी संकटे आणि वादळे असतानाही, आपल्या मनाची स्थिरता टिकवून ठेवणे होय.

राजा त्या उत्तरावर खूप प्रसन्न झाला आणि त्याने त्या चित्रकाराला बक्षीस दिले.

**तात्पर्य :** खऱ्या अर्थाने शांतता बाहेरच्या जगात नसून ती आपल्या मनात असते. परिस्थिती कितीही कठीण असली, तरी मन स्थिर असेल तर आपण शांत राहू शकतो.

## आत्मशक्ति



### सकारात्मक ऊर्जा

एका नात्यातील कडवटपणा इतर नात्यांवरही परिणाम करतो कारण आपलं मन दुःखात असतं. आपण असा विचार करतो की नातं बाह्यतः अस्तित्वात असतं, पण खरं तर ते आपल्या मनात असतं. मी तुमच्याबद्दल जो विचार करते, तो विचार मनात नातं निर्माण करतो आणि माझ्या मनात मी काय निर्माण करायचं ही संपूर्णपणे माझी निवड आहे.

एखाद्याबरोबर आपले वादविवाद असतील तर आपण त्यांच्याबद्दल विचार करण्याची पद्धत बदलली पाहिजे. जेव्हा आपण नातं बाह्यतः बदलायचा प्रयत्न करतो जसं, फक्त बोलण्याची किंवा एकमेकांशी वागण्याची पद्धत बदलतो किंवा पूर्वी घडलेल्या घटनेबद्दल चर्चा करून वाद वरवर सोडवण्याचा प्रयत्न करतो. अशा वेळी वाद मिटण्याऐवजी ते जास्त गुंतागुंतीचे होतात. ह्यातून बाहेर पडायचा सोपा मार्ग म्हणजे आपल्या विचारांची गुणवत्ता तपासणं. नात्यांमधले अडथळे आपल्या मनात असतात, आपल्यात नसतात. हा प्रयोग कदाचित वेगळा वाटू शकतो. पण आपण तो करून बघायला हवा.

सुरेश ओबेरॉय : आणि ज्या व्यक्तीशी वाद झाले आहेत त्या व्यक्तीला आपण विसरू शकत नसलो तर काय ? हे विचार येऊ न देण्यासाठी काहीतरी मंत्र (उपाय) सांगा.

शिवानीदीदी : जर माझे तुमच्या बरोबर वाद झाले आहेत आणि मी तुमच्याबद्दल विचार करत आहे तर मी खूपच शक्तिशाली नकारात्मक ऊर्जा निर्माण करत आहे. ही ऊर्जा तुमच्यापर्यंत पोहोचेल आणि तुमचे माझ्या बरोबर वाद झालेले असल्याने आणि माझ्याकडून तुम्हाला नकारात्मक ऊर्जा मिळत असल्याने तुमचे विचारही खूप नकारात्मक होतील. नंतर तुमचे विचार माझ्यापर्यंत पोहोचतील आणि मी अजून नकारात्मक बनेन. हे असंच चालू राहील. हे एकमेकांकडे शक्तिशाली नकारात्मक ऊर्जेचे चेंडू फेकण्यासारखं आहे. व जीवनसाथीशी व मित्रांशी पूर्वीप्रमाणेच प्रेम करतो. फरक एवढाच पडतो की, अंतरी आमच्या आत्म्याला न्याहाळल्यानंतर व त्याचे निःस्वार्थ प्रेम मिळाल्यानंतर आम्हाला पूर्ण आनंद व प्राप्त होते ज्याची आम्ही अपेक्षा करत असतो. आम्ही अंतरी पूर्ण समाधानी होतो व त्यामुळे सुख आणि प्रसन्नतेसाठी आम्ही दुसऱ्यावर अवलंबून राहत नाही. उलट आमचे निस्वार्थ प्रेम इतरांना वाटू लागतो. प्रेम मिळवण्याच्या ऐवजी प्रेम देऊ लागतो. असे केल्याने आम्हाला स्पष्ट होते की, आमचे संबंध अधिकच विनम्र, समजूतदार आणि शांत होत जातात.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### विचार

आधुनिक शास्त्रानुसार : तांबड्या भोपळ्यामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, नायसिन, कॅरोटिन, 'क' जीवनसत्त्व, थायमिन, रिबोफ्लेविन, प्रथिने, खनिजे, आर्द्रता, तंतुमय व पिष्टमय पदार्थ हे सर्वच पौष्टिक घटक विपुल प्रमाणात असतात.

सुरेश ओबेरॉय :

ही तिरस्काराची देवाण-घेवाण आहे.

शिवानीदीदी : हे चेंडू आपण सतत एकमेकांकडे टाकत आहोत.

सुरेश ओबेरॉय :

ह्यावर तोडगा कसा काढायचा?

शिवानीदीदी : आपल्याला नात्यांमध्ये जडपणा जाणवायला लागेल. आपण कितीही मैत्रीपूर्ण वागायचा प्रयत्न केला तरीही त्या नात्यात आपण दुखावले जाऊ कारण आपल्यामध्ये नकारात्मक तरंगांची देवाणघेवाण सुरू आहे.

समजा, नकारात्मक ऊर्जा निळ्या रंगाची आहे. मी तुमच्याकडे हा निळा चेंडू फेकत आहे आणि तोच तुम्ही पुन्हा माझ्याकडे फेकत आहात आणि हे असंच चालू आहे. ह्या प्रचंड नकारात्मक ऊर्जेची देवाणघेवाण थांबवणार कशी?

सुरेश ओबेरॉय :

आपण आपल्याकडून थांबवू शकतो.

शिवानीदीदी :

त्यासाठी आपल्याला काय करावं लागेल ?

सुरेश ओबेरॉय :

आपण चेंडू परत फेकायचा थांबवू शकतो, याचा अर्थ आपण एकमेकांबद्दल विचार करणं थांबवू शकतो.

शिवानीदीदी : हे शक्य नाही.

सुरेश ओबेरॉय : आपण सकारात्मक चेंडू पाठवू शकतो.

शिवानीदीदी : हो, आपल्याकडे हा एकमेव पर्याय आहे. चेंडू फेकणं आपण थांबवू शकत नाही कारण ज्यांच्या बरोबर आपलं खूप खोल नकारात्मक कार्मिक खातं असतं त्यांचा विचार करणं आपण थांबवू शकत नाही. भलेही आपण चेंडू (विचार) फेकला नाही तरीही त्यांचे चेंडू आपल्याकडे येतच राहणार. त्याने आपल्या विचारांना पुन्हा चालना मिळेल आणि ही देवाण-घेवाण चालूच राहील. आपल्याला सकारात्मक परिणाम हवा असेल तर आपण पाठवत असलेल्या चेंडूचा रंग खूप काळजीपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक बदलावा लागेल. दोघांपैकी एकाने जरी असा बदल केला तरी हे होऊ शकतं.

उदाहरणार्थ, मी तुमच्याकडे निळा चेंडू पाठवला आणि तुम्हीसुद्धा माझ्याकडे काळा चेंडू पाठवला. मी पुन्हा तुमच्याकडे निळा चेंडू पाठवला पण या वेळेस तुम्ही माझ्याकडे सकारात्मक ऊर्जेचा पांढरा चेंडू पाठवला. मी जरी तुमच्याकडे सतत निळे चेंडू पाठवत असले तरीही ज्या क्षणी मी तुमच्याकडून पांढरा चेंडू स्वीकारते, तेव्हा मला थोडसं हलकं वाटतं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**शिक्षक :** गंपू, 'आळस' म्हणजे काय? हे उदाहरणासहित सांग.

गंपूने कोरी वही शिक्षकांना दाखवली.

**शिक्षक :** हे काय आहे? **गंपू :** सर, हाच तर आळस!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'उस्ताद बिस्मिल्ला खान युवा पुरस्कार'कोणत्या केंद्रीय मंत्रालयाशी संबंधित आहे? - सांस्कृतिक मंत्रालय

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### निर्भयता

लाल भोपळा या फळभाजीबरोबरच त्यामधील बियासुद्धा आरोग्याच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. या बियांमध्ये तांबड्या भोपळ्यापेक्षा जास्त प्रमाणात प्रथिने, फॉस्फरस व लोह असते. नैसर्गिक प्रथिनांनी युक्त असलेल्या या बियांचा आमटीसाठी, तसेच मिठाईमध्ये सजावटीसाठी वापर करावा.

उपयोग : १) भोपळा ही फळभाजी अल्कलीयुक्त असून, पित्तशामक व सौम्य सारक असल्यामुळे ती खाल्ल्यानंतर सहज पचते व आरोग्यास उपकारक ठरते. तिच्यामुळे शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढते. हानिकारक रोगजंतू शौचावाटे बाहेर पडतात. कारण ती सारक गुणधर्माची असल्यामुळे संपूर्ण पचते. पचनसंस्था स्वच्छ करण्याचे गुणधर्म तिच्यामध्ये असतात. यामुळे शिजविलेल्या तांबडा भोपळ्याचे सूप प्यावे किंवा नियमित भाजी करून खावी.

२) कृश व्यक्तींनी वजन वाढण्यासाठी व रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी तांबड्या भोपळ्याच्या २५ ते ३० बिया व दहा बदाम गायीच्या दुधात बारीक करून रोज घ्याव्यात. यामुळे वजन वाढते व शरीराची जंतूविरुद्ध लढण्याची ताकद वाढते. जुनाट खोकला, ताप, क्षयरोग झालेल्यांनी वरील प्रयोग केल्यास आजार लवकर आटोक्यात येतात.

३) आम्लपित्त, अपचन, पोटात गॅस धरणे या विकारांवर सकाळी अनुशापोटी भोपळ्याचे सूप किंवा रस एक मोठा बाऊलभर घेऊन त्यात लिंबूरस एक चमचा, हिंग चिमूटभर, आलेरस अर्धा चमचा, जिरेपावडर पाव चमचा आणि अर्धा चमचा सैंधव घालून प्यावा. यामुळे आतड्यांची हालचाल वाढून भूक चांगली लागते व घेतलेला आहार व्यवस्थित पचतो.

४) लघवीला आग होणे, थेंब थेंब लघवी होणे, पुरुषामध्ये प्रोस्टेट ग्रंथी वाढल्यामुळे मूत्रविसर्जनास

५) त्रास होणे या विकारांवर तांबड्या भोपळ्याच्या बिया दुधामध्ये बारीक करून ते दूध प्यावे, तसेच भोपळ्याचे सूप व रसही या विकारांमध्ये फायदेशीर ठरतो. यामुळे शरीरातील अतिरिक्त उष्णता कमी होऊन लघवी साफ होते. तांबडा भोपळा अल्कली गुणधर्माचा असल्यामुळे त्याच्या सेवनाने रक्तातील अतिरिक्त आम्लता कमी होऊन उष्णतेचे विकार व त्वचेचे विकार कमी होतात.


**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# वारी पंढरपूरची

## ज्ञानेश्वरांचे आजोबा - गोविंदपंत कुलकर्णी



'संतकृपा झाली। इमारत फळा आली।।' असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा त्या इमारतीचा पाया ज्यांनी मजबूत केला, त्या पूर्वजांचे स्मरण करणे अत्यंत गरजेचे असते. जगद्गुरु संत ज्ञानेश्वर महाराज, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव आणि आदिमाता मुक्ताबाई या चार दिव्य भावंडांनी महाराष्ट्राला जे भक्तीचे अमृत दिले, त्या अमृताचा मुख्य झरा आपेगावच्या भूमीत उगम पावला होता.

माउलींच्या या घराण्यात भक्तीची आणि वारीची परंपरा रुजवणारे मुख्य पुरुष म्हणजेच त्यांचे आजोबा 'श्री गोविंदपंत कुलकर्णी' महाराज.

गोविंदपंत महाराजांचे जीवन साधेपण, सदाचार आणि विठ्ठल चरणी असलेल्या अढळ निष्ठेचे प्रतीक आहे.

गोविंदपंत महाराज हे गोदावरीच्या तीरावरील पवित्र श्रीक्षेत्र आपेगाव (तालुका पैठण) येथील कुलकर्णी होते. ते अत्यंत धार्मिक, सच्छील आणि ऋजू स्वभावाचे ब्राह्मण होते. गोदावरीच्या कुशीत वसलेल्या आपेगावच्या वाड्यात त्यांचे निवासस्थान होते.

त्यांच्या पत्नीचे नाव सतीबाई होते. हे दाम्पत्य घराण्यात येणाऱ्या प्रत्येकाचा आदरतिथ्य करायचे. घरी येणाऱ्या साधू-संतांची सेवा करणे, गोरगरिबांना अन्नदान करणे हा त्यांचा नित्यनेम होता. परंतु, या सात्त्विक दाम्पत्याच्या पदरात बरीच वर्षे अपत्य नव्हते. त्यांनी विठ्ठल चरणी आर्त प्रार्थना केली आणि अनेक नवस-सायासांनंतर त्यांच्या पोटी एका दिव्य पुत्राचा जन्म झाला, ज्यांचे नाव त्यांनी 'विठ्ठलपंत' (माउलींचे वडील) असे ठेवले.

बरेचदा अनेकांना हा प्रश्न पडतो, वारीची सुरवात संत ज्ञानेश्वरांनी केली का? तर वारकरी संप्रदायाच्या इतिहासामध्ये आणि महिपती महाराज कृत 'भक्तविजय' तसेच 'संतलीलामृत' सारख्या अधिकृत ग्रंथांमध्ये या प्रश्नाचे अत्यंत स्पष्ट आणि सुंदर उत्तर मिळते.

संत ज्ञानेश्वरांच्या आधीपासून वारीची सुरवात झाली होती कारण त्यांचे आजोबा श्री गोविंदपंत महाराज हे पंढरीचे अत्यंत नियमनिष्ठ वारकरी होते आणि ते नित्यनेमाने आषाढी-कार्तिकीची पायी वारी करत असत.

ज्ञानेश्वर माउलींचे हे घराणे मूळचेच विठ्ठलभक्त होते. गोविंदपंत महाराजांचे वडील आणि त्यांचे पूर्वजही पंढरीचे वारकरी होते. गोविंदपंत यांनी ही वारीची परंपरा अत्यंत निष्ठेने पुढे चालवली. दरवर्षी शेतात पेरणी झाली की, आषाढ महिन्याची ओढ लागली की गोविंदपंत हातात टाळ घेऊन, गळ्यात तुळशीची माळ घालून आपेगावहून पंढरपूरकडे पायी निघत असत.

विठ्ठलपंत (माउलींचे वडील) लहानपणापासून विरक्त आणि अध्यात्माकडे झुकलेले होते, याचे मुख्य कारण म्हणजे त्यांना बालपणी लाभलेले वडील गोविंदपंत महाराजांचे संस्कार! गोविंदपंत जेव्हा पंढरीच्या वारीला जायचे, तेव्हा ते बाल विठ्ठलपंतांनाही सोबत घेऊन जायचे. चंद्रभागेचे स्नान, विठ्ठलाचे दर्शन आणि वारीतील संतांचा सत्संग यांमुळेच विठ्ठलपंतांच्या मनात लहानपणीच तीव्र वैराग्य निर्माण झाले होते. थोडक्यात सांगायचे तर, माउलींच्या वडिलांना वारीची पहिली दीक्षा देणारे त्यांचे वडील गोविंदपंत महाराजच होते.

विठ्ठलपंत जसे मोठे झाले, तसे त्यांचे प्रपंचातील मन उडाले. ते तीर्थयात्रा करत करत आळंदीला पोहोचले. तिथे आळंदीचे सिद्धोपंत कुलकर्णी यांनी विठ्ठलपंतांची सात्त्विकता पाहून आपली मुलगी 'रुक्मिणीबाई' हिचा विवाह विठ्ठलपंतांशी करून देण्याचा प्रस्ताव ठेवला. पण विठ्ठलपंत विरक्त असल्याने त्यांनी सांगितले, माझ्या वडिलांच्या (गोविंदपंतांच्या) संमतीशिवाय मी विवाह करू शकत नाही.

त्याच रात्री एक अद्भूत प्रसंग घडला. आपेगावमध्ये वृद्ध गोविंदपंत आपल्या मुलाच्या विरहाने चिंतेत होते. साक्षात पंढरीच्या विठ्ठलाने गोविंदपंत महाराजांना स्वप्नात दृष्टांत दिला: गोविंदपंता, चिंता करू नकोस. तुझा मुलगा आळंदीला सिद्धोपंतांच्या घरी आहे. तू तातडीने आळंदीला जा आणि विठ्ठल-रुक्मिणीचा हा विवाह आनंदाने घडवून आण. हा विवाह केवळ एक संसाराची सुरुवात नाही, तर यातून विश्वाचे कल्याण करणारे दिव्य अवतार भूतलावर येणार आहेत.

भगवंताचा हा दृष्टांत होताच गोविंदपंत आणि सतीबाई आनंदाने आळंदीला आले. त्यांनी विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाईंचा विवाह लावून दिला. साक्षात ईश्वरी इच्छेने झालेल्या या विवाह सोहळ्याचे साक्षीदार गोविंदपंत महाराज होते.

लग्नानंतर काही काळाने विठ्ठलपंत प्रपंचाला कंटाळून, कोणालाही न सांगता काशीला निघून गेले आणि तिथे त्यांनी संन्यासाची दीक्षा घेतली. आपला एकुलता एक गुणवान मुलगा गृहस्थाश्रम सोडून संन्यासी झाला, हे ऐकून वृद्ध गोविंदपंत आणि सतीबाई यांच्यावर दुःखाचा कडाडून डोंगर कोसळला.

आपल्या वंशाचा दिवा आणि म्हातारपणाचा काठी असलेला मुलगा निघून गेल्यामुळे ते अत्यंत व्याकुळ झाले. असे म्हटले जाते की, पुत्राच्या विरहाने आणि वृद्धत्वामुळे त्यांचे उर्वरित आयुष्य आपेगावमध्ये अत्यंत विरक्तीत आणि विठ्ठल नामाचा धावा करण्यात गेले. पुढे विठ्ठलपंत जेव्हा गुरूंच्या आज्ञेने पुन्हा गृहस्थाश्रमात परत आले, तोपर्यंत गोविंदपंत महाराज अत्यंत वृद्ध झाले होते किंवा काळाच्या पडद्याआड गेले होते, असे संदर्भ इतिहास संशोधक मांडतात.

आज जेव्हा आपण आळंदीत माउलींच्या समाधीवर डोके टेकवतो किंवा पंढरपुरात विठ्ठलाचे रूप डोळ्यांत साठवतो, तेव्हा आपल्याला आपेगावच्या त्या पवित्र मातीचे आणि गोविंदपंत महाराजांचे स्मरण केले पाहिजे.

जर गोविंदपंत महाराजांनी वारीची ती परंपरा पाळली नसती, विठ्ठलपंतांवर भक्तीचे संस्कार केले नसते, तर कदाचित आपल्याला 'ज्ञानेश्वरी' सारखा महान ग्रंथ आणि 'माउलीं'सारखे दैवत लाभले नसते. वारकरी संप्रदायाचे बी पेरण्याचे महान कार्य या आजोबांनी केले आहे.

अशा या माउलींच्या घराण्याचे आद्य पुरुष, पंढरीचे निस्सीम वारकरी, साक्षात पांडुरंगाचा दृष्टांत लाभलेले संत श्रेष्ठ श्री गोविंदपंत महाराज यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन..

श्री गोविंदपंत महाराज की जय! ज्ञानबा-तुकाराम! रामकृष्णहरी!



**रमेश देशपांडे**
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## दिसते तसे नसते

"मुसाफिर"
संकलन: दिशान फिचर्स




तो जगावेगळा दिसतो। दिसतो नव्हे असतो। तो. थोरामोठ्यांची वचनं, वेदोपनिषदातले संस्कृत उतारे तोंडपाठ म्हणून दाखवतो. तो कधी एकटा नसतो. आम्ही त्याला पुढरी म्हणता. मग तो आपलं कल्याण करतो. आपलं म्हणजे? तुमचं आमचं? छे, स्वतःच । कारण वरुन दिसतं तसं आतून नसतं. पाहा ना, हे सुभाषित काय सांगतं? दिखाऊ पुढाऱ्याचं अन्योक्तीनं वर्णन करतं. बहिरति निर्मलरूपं वहतस्ते दीप दैवतो जगति । ज्वल्य कज्जलद्वारा ।।

दिव्यात तेल भरा. तेल असतं तोवर तो कसा लख्ख प्रकाश देतो. तेव्हा वाटतं केवढा हा स्वच्छ, निर्मळ, पण हे रुप वरवरचं. संपू देत तेल. मग कळतं स्वरुप आतलं। आत नुसतं काजळ काळं. बाहेरचा स्वच्छ प्रकाश पाहून ज्याला जगानं देव मानलं, त्याचं अंतरंग राक्षसी निघालं. वरवरच्या देखाव्याला भाळण्यात आपलंच चुकलं । माणसाला ओळखणं कठीण होउन बसलं. संत तुकारामांना का हा अनुभव नव्हता?

ते म्हणतात, टिळे टोपी उंच दावी । जनी मी एक गोसावी ।। अवघा वर रंग सारा । पोटी विषयाचा थारा।। मुद्रा लाविती कोरोनी। मान व्हावयासी जनी ।। तुका म्हणे ऐसे किती। नरका गेले पुढे जाती। कपाळावर पांढरा टिळा. ओरडतो खरडून गळा. अहो मी गोसावी आगळा. पाहा ही उंच टोपी। मुद्रा कोरल्या गालावरती. हे सगळं मान मिळवायला जगती। पण हा देखावा वरवरती। आतून अगदी विरुद्ध मती. वासनांची मनात गर्दी. लोकांना लुबाडण्यात दर्दी. असे हे ढोंगी नरकाचेच धनी. कित्येक गेलेत त्या नरकात । पुढेही जातील. आजवर पुढारी उपदेश करताना म्हणती, लोक हो सुधारा ना, पण खरंच लोक सुधारले, तर पुढाऱ्यांना ते मानवेल का? खलील जिब्रानची एक कहाणी तुम्ही ऐकली का? तो म्हणतो, एका गावात आला. एक वयस्कर कुत्रा. गल्लीतल्या कुत्र्यांना केलं त्यानं गोळा. म्हणाला, अरे असे काय रात्रभर भुंकता? एकमेकांशी भांडता? हे सगळे बंद करा. स्वतःला सुधारा.

त्याचा उपदेश ऐकून कुत्री लाजली. म्हणाली, खरंच पाहिजे आपली वागणूक सुधारली. हा नवा वयस्कर कुत्रा आपला पुढारी । त्या वयस्कर कुत्र्यालादेखील मग मानवली नेतेगिरी. सगळे कुत्रे करीत त्याची चाकरी. कुत्र्याचं भुंकण ऐकलं की ओरडायची. तो पुन्हा उपदेश करायचा. एका रात्री त्यांनी ठरवलं, की आपण नाहीच भुंकायचं। सगळी गल्ली शांत. पुढारी कुत्रा दचकला. आपला भक्त मेळा खरंच का सुधारला? तो पुढारी बेचैन झाला. सगळे भक्त सुधारले, तर आपलं कामच संपलं. मोठेपण गेलं । मग तो पुढारी कुत्रा स्वतः गळा काढून भुंकू लागला. मग इतर सगळ्य कुत्र्यांना जोर चढला. कुणी तरी एक भुंकतोय, हे ऐकताच त्यांचा जोष अनावर झाला. एकेक करुन सगळी कुत्री भुंकायला लागली.

पुढारी कुत्र्याचा आता जीव भांड्यात पडला. तो पुन्हा त्या सगळ्यांना उपदेश करायला उभा झाला. अरे कुत्र्यांनो, स्वतःला सुधारा रे, असं उगाच भुंकू नका रे।

**- किशोर गांधी**

# साहित्य संमेलनात बाळासाहेब देशमुख यांचे होणार कथाकथन



नगर - स्व पै किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व पै. नाना डोंगरे व्यायाम शाळा,निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय ७ वे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन, निमगाव वाघा येथे २५ जुलै रोजी संपन्न होत आहे. साहित्य संमेलनाध्यक्षपदी साहित्यिक शंकर अंदानी यांची निवड झालेली आहे. साहित्य संमेलन आयोजक नाना डोंगरे यांनी पत्र पाठवून, कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना कथाकथन कार्यक्रमाकरिता निमंत्रित केलेले आहे.

कथालेखक बाळासाहेब देशमुख, कथाकथन कार्यक्रमात 'संवाद' ही कथा सांगणार आहेत. बाळासाहेब देशमुख यांचे आजवर अहिल्यानगर जिल्ह्यात ५०० प्रयोग पूर्ण झालेले आहेत. शिवाय विविध आकाशवाणी केंद्रावर १२० कथा प्रसारित झालेल्या आहेत. राज्यस्तरीय साहित्य संमेलन मध्ये त्यांचे आजवर २९ कथाकथन प्रयोग पूर्ण झालेले आहेत.. रंग माझा वेगळा, माणसे अशी.. अन् तशीही..., माणसं भिंगातून... हे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पालवे, बाबुराव उपाध्ये, दिलीप कापसे, रूपचंद शिदोरे , सुरेखा घोलप यांनी अभिनंदन केले आहे.

# प्रविणऋषी महाराज यांची स्कायब्रिज येथे आशिर्वादपर भेट

नगर - नगरमधील बुरूडगाव रोडवरील स्कायब्रिज गृहप्रकल्पाला प्रविणऋषी महाराज यांनी नुकतीच आशीर्वादपर भेट दिली. त्याच्या समवेत पूज्य तीर्थेशऋषी महाराज उपस्थित होते. स्कायब्रिज येथील सर्व परिवारांनी उपाध्यायश्रीजींचे उत्स्फूर्त स्वागत केले.

यावेळी उपाध्यायश्री प्रविणऋषी महाराज म्हणाले, आचार्यश्रीजींची भूमी असलेल्या अहिल्यानगरमध्ये धर्माचरण आणि धर्माप्रतीची निष्ठा ओतप्रोत भरलेली आहे. आचार्यश्रींच्या समाधीस्थळापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या स्कायब्रिज गृहप्रकल्पात सर्व रहिवासी अतिशय मनोभावे साधूसंतांची सेवा करतात. याठिकाणी सर्व सण उत्सव एकत्रित साजरे केले जातात. प्रत्येक जण आपुलकीचा नात्याने एकमेकांशी जोडला गेलेला आहे. नगरमध्ये होणाऱ्या समर्पण



नगरमधील बुरूडगाव रोडवरील स्कायब्रिज गृहप्रकल्पाला प्रविणऋषी महाराज यांनी नुकतीच आशीर्वादपर भेट दिली.

चातुर्मासात सर्वांना एका धाग्याने जोडण्याचा प्रयत्न आहे. स्कायब्रिजमध्ये आल्यावर सकारात्मक ऊर्जेची अनुभूती येते. या सर्व रहिवाशांनी आपला एकोपा आणि जिव्हाळा असाच कायम राखावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

स्कायब्रिजचे अध्यक्ष अमृतलाल कोठारी म्हणाले, साधूसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा अशी शिकवण आपल्या संस्कृतीने दिली आहे. उपाध्यायश्रीजींचे मंगल आगमन चैतन्यदायी आहे. त्यांच्या पदस्पर्शाने आणि आशीर्वादानेच स्कायब्रिज पुनित झाली आहे. त्यांच्या सान्निध्यात होणारा आगामी समर्पण चातुर्मास खऱ्या अर्थाने सर्वांच्या जीवनाला नवी दिशा देणारा ठरेल यात शंका नाही. यावेळी स्कायब्रिज गृहप्रकल्पातील सर्व रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपाध्यायश्रीजींनी याठिकाणी मंगल पाठ दिला.



बहुजन शिक्षक संघाचे मुलांचे वस्तीगृह, भीमा गौतमी मुलींचे वस्तीगृह तसेच दादासाहेब रूपवते हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

# बौद्ध संस्कार संघाकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात

नगर - बहुजन शिक्षक संघाचे मुलांचे वस्तीगृह, भीमा गौतमी मुलींचे वस्तीगृह तसेच दादासाहेब रूपवते हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना बौद्ध संस्कार संघाकडून शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले तसेच १० वी, १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार महावितरणचे सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता दिलीप भोळे यांच्या हस्ते करण्यात आला.

दरवर्षी बौद्ध संस्कार संघाच्या उपकमांतून प्रयत्नपूर्वक शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना दिले जात आहे. त्यातून अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडले आहे. गेले २० वर्षापासून या उपक्रमाला बौद्ध संस्कार संघांचे सदस्य नियमितपणे तन-मन धनाने मदत करत आहेत. ही मदत घेऊन अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर तसेच विविध क्षेत्रात नोकरी करीत आहेत. काही उत्तम व्यावसायिक बनले आहेत. तर समकालीन सेवानिवृत्त शासकीय अधिकारी समाजसेवा करीत आहेत, असे महावितरणचे सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता दिलीप भोळे यांनी सांगितले.

विसापूर बेगर्स होमचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुशील तुरुकमाने म्हणाले, मी वैद्यकीय शिक्षण घेत असताना पाच दिवस धम्मसंस्कार शिबिरात प्रशिक्षण घेतले आहे तसेच माझी मुले, परिवार दरवर्षी धम्मप्रशिक्षण घेत आहेत.

या उपक्रमात गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर केतन देठे यांनी विद्यार्थ्यांना साहित्य व संस्थेसाठी टेबल फॅन दिला. दिलीप भोळे यांनीही दहा स्कूल बॅग दिल्या. प्रा. दिलीप गायकवाड यांनी तीन डझन रजिस्टर नोटबुक व पेन मदत केली. उद्योजक श्रीरंग शेळके, उद्योजक नानासाहेब डोईफोडे, उद्योजक सिद्धार्थ भोसले यांनी दहा स्कूलबॅग व आठ डझन रजिस्टर नोटबुकची मदत केली. डॉ. प्रा. किरणकुमार साळवे यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केला.

१२ वी सायन्समध्ये अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वप्रथम आलेली तानवडे ईशा हिचा विशेष सत्कार करण्यात आला. देशमुख गायत्री, मुळे ज्ञानेश्वरी, शिंदे समृद्धी, कोरडे ज्ञानदेव, नरसाळे सपना यांच्यासह १० वीतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य प्रमोद सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्ते अजय साळवे, महेश भोसले, ॲड. बळीराम ऊके, इंजिनिअर संजीव घोडके, बि. डी. शिंदे, प्रदीप साळवे, शशिकांत घोडके, एस. के. गायकवाड, सुरेश घायमुक्ते, प्रतिभाताई देठे, राजेंद्र थोरात, डॉ. संजय शिंदे, भाऊसाहेब आव्हाड आदी उपस्थित होते. प्रास्ताविक पर्यवेक्षक प्रा. जयंत गायकवाड, बौद्धाचार्य भाऊसाहेब देठे यांनी केले. आभार संजीवन साळवे यांनी मानले.

# चिमुकल्यांच्या वृक्षदिंडीत पर्यावरण संरक्षणाचा संदेश

### यशवंत गाडे विद्यालयाचा उपक्रम



मुकुंदनगर येथील यशवंतराव गाडे विद्यालयाच्या वृक्षदिंडीत सहभागी झालेले विद्यार्थी.

नगर - अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर येथील यशवंतराव गाडे माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित पारंपरिक बाल वृक्षदिंडी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून टाळ-मृदंगाच्या गजरात झाडे लावा झाडे जगवाचा जयघोष करत पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.

मुख्याध्यापिका संगिता बनकर, जेष्ठ शिक्षक उध्दव गुंड, भाऊसाहेब काकडे यांच्या हस्ते पूजन करून दिंडीचे प्रस्थान करण्यात आले. दिंडीत शाळेतील लहान विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संतांच्या अभंगांमुळे आणि हरिनामाच्या गजरामुळे परिसर भक्तिमय झाला होता. दिंडी मार्गावर नागरिकांनी बाल वारकऱ्यांचे उत्साहात स्वागत केले.

वारकऱ्यांच्या वेशभूषेतील लहान मुले, त्यांच्या डोईवर वृक्ष , हातात वृक्ष संवर्धनाचे फलक आणि झाडे लावा झाडे जगवा चा नारा ', अशा भक्तिमय वातावरणात मुकुंदनगर, फकिरवाडा, गोविंदपूरा भागातुन दिंडी ढोल ताशाच्या गजरात मार्गस्थ झाली. दिंडीत सहभागी झालेली छोटे विद्यार्थी विद्यार्थिनींनी विठ्ठल रुक्मिणी तसेच पारंपारिक वेशभूषेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग कौतुकाचा विषय ठरला. मुलींचे झांजपथक दिंडीचे आकर्षण ठरले.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पसायदान जन अदालत सूर्यानामा आंदोलन करण्याचा इशारा

नगर - महाराष्ट्रातील खासगी जागांवर अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या पात्र झोपडीधारकांना त्यांच्या घरांसह जमिनीचे कायदेशीर मालकीहक्क मिळावेत, तसेच मूळ जमीनमालकांना हस्तांतरणीय विकास हक्क अर्थात टीडीआर किंवा न्याय्य मोबदला देऊन दोन्ही घटकांना न्याय मिळावा, या प्रमुख मागणीसाठी २४ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पसायदान जनलोक अदालत सूर्यानामा आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

मेरे देश में मेरा अपना घर आंदोलन, पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या आंदोलनाच्या माध्यमातून राज्य सरकारने झोपडपट्टी पुनर्वसन आणि मालकी हक्काबाबत व्यापक धोरण जाहीर करावे, अशी मागणी करण्यात येणार आहे.

देशातील गरीब, कष्टकरी, भूमिहीन, दलित, भटके-विमुक्त, स्थलांतरित मजूर आणि झोपडपट्टीवासीयांना सुरक्षित व कायदेशीर निवाऱ्याचा अधिकार मिळावा, या उद्देशाने पीपल्स हेल्पलाईनने २०१४ मध्ये सुरू केलेल्या मेरे देश में मेरा अपना घर आंदोलनाला आता अधिक व्यापक स्वरूप देण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या जनआंदोलनात झोपडपट्टीवासीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. या आंदोलनाद्वारे महाराष्ट्र शासनाने टीडीआर आधारित झोपडपट्टी जमीन-मालकी योजना संपूर्ण राज्यात लागू करावी, खासगी जागांवरील पात्र झोपडीधारकांचे पारदर्शक सर्वेक्षण करून त्यांना कायदेशीर मालकी सनद द्यावी आणि मूळ जमीनमालकांना विकासहक्क किंवा न्याय्य मोबदला प्रदान करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

शहरांच्या विकासासाठी प्रत्यक्ष श्रम करणारी लाखो गरीब कुटुंबे अनेक दशकांपासून झोपड्यांमध्ये वास्तव्यास आहेत. तरीही त्यांना आजपर्यंत कायदेशीर मालकीहक्क मिळालेला नाही. दुसरीकडे, मोठ्या बांधकाम प्रकल्पांना अतिरिक्त बांधकामक्षमता, विकासहक्क आणि विविध आर्थिक सवलती दिल्या जातात. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील ही विषमता भारतीय संविधानातील सामाजिक व आर्थिक न्यायाच्या संकल्पनेच्या विरोधात असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

# अहिल्यानगर डाक विभागातील उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी यांचा गौरव

नगर - भारतीय डाक विभाग, अहिल्यानगर विभागाच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, शाखा पोस्टमास्तर संपूर्ण सुकन्या ग्राम अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती व सरपंच यांचा भव्य सन्मान व पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.



डाक विभागातील उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी यांचा गौरव करताना पोस्टमास्टर जनरल सौ. प्रीती अग्रवाल व मान्यवर.

स्टेशन रोड येथील सहकार सभागृहात झालेल्या या सन्मान सोहळ्यात कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. प्रीती अग्रवाल (पोस्टमास्टर जनरल, पुणे क्षेत्र) यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास विकास पालवे (वरिष्ठ अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर विभाग) विभागातील अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी, सरपंच, शाखा पोस्टमास्तर, विविध मान्यवर तसेच नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर भारतीय डाक विभागाच्या विविध लोकाभिमुख उपक्रमांचा आढावा सादर करण्यात आला. अहिल्यानगर विभागाने ग्रामीण तसेच शहरी भागात राबविलेल्या बचत योजना, पोस्टल लाईफ इन्शुरन्स, ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्स, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक, आधार सेवा, स्पीड पोस्ट, वित्तीय समावेशन आणि महिला व बालकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात आलेल्या संपूर्ण सुकन्या ग्राम अभियानाची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

यानंतर पोस्टमास्टर जनरल सौ. प्रीती अग्रवाल यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. संपूर्ण सुकन्या ग्राम अभियान प्रभावीपणे राबवून गावातील पात्र मुलींची मोठ्या प्रमाणावर सुकन्या समृद्धी खाते उघडण्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ग्रामपंचायती व सरपंचांचा प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. तसेच ग्रामीण भागात उत्कृष्ट ग्राहक सेवा, शासकीय योजनांचा प्रभावी प्रचार-प्रसार आणि डाक विभागाच्या सेवांचा विस्तार करणाऱ्या शाखा पोस्टमास्तरांचा विशेष सन्मान करण्यात आला.

याशिवाय भारतीय डाक विभागातील विविध संवर्गांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी व कर्मचारी यांनाही त्यांच्या कार्याची दखल घेऊन प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ प्रदान करण्यात आले. उत्कृष्ट सेवा, नाविन्यपूर्ण उपक्रम, ग्राहकाभिमुख कार्यपद्धती, महसूलवाढ, उत्कृष्ट कार्यालयीन व्यवस्थापन आणि विभागाच्या उद्दिष्टपूर्तीत दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.विशेषतः संपूर्ण सुकन्या ग्राम अभियानामुळे मुलींच्या आर्थिक सुरक्षिततेबाबत समाजात जनजागृती झाली असून ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांनी सुकन्या समृद्धी योजनेचा लाभ घेतला आहे. हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच भविष्यात भारतीय डाक विभागाच्या सर्व योजना अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन सौ. प्रीती अग्रवाल यांनी केले.

यावेळी विकास पालवे (वरिष्ठ अधीक्षक डाकघर, अहिल्यानगर विभाग) यांनी विभागाच्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचा आढावा घेतला. अहिल्यानगर विभागाने ग्राहकाभिमुख सेवा, डिजिटल सुविधा, ग्रामीण भागातील वित्तीय समावेशन, विमा व्यवसाय, बचत बँक सेवा आणि सुकन्या समृद्धी योजनेच्या प्रसारामध्ये उल्लेखनीय प्रगती साधल्याचे त्यांनी सांगितले. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामीण भागातील सहकार्य करणाऱ्या ग्रामपंचायती व सरपंचांना प्रोत्साहन देण्यासाठी भविष्यातही अशा गौरव समारंभांचे नियमित आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



स्व. अजित पवार जयंतीनिमित्त बुरुडगावात 'लाडक्या बहिणीं'ना साड्यांची भेट देताना संकेत कुलट आणि नवनाथ वाघ.

## स्व. अजित पवार जयंतीनिमित्त बुरुडगावात 'लाडक्या बहिणीं'ना साड्यांची अनोखी भेट

नगर – राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त बुरुडगाव येथे सामाजिक बांधिलकी जपत महिलांसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. गावातील संकेत कुलट आणि नवनाथ वाघ यांच्या पुढाकारातून तसेच आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील 'लाडक्या बहिणीं'ना नवीन सहावारी व नऊवारी साड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात एक हजारांहून अधिक महिलांना साड्यांचे वितरण करण्यात आले असून, महिलांचा या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर गावातील महिलांना नवीन सहावारी आणि नऊवारी साड्यांचे वितरण करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत महिलांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

याप्रसंगी सोनाली कुलट, स्नेहल कुलट, मनिषा कुलट, मंगल वाघ, सुभाष कुलट, मुन्ना कुलट, विशाल पवार, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे, मुख्याध्यापक मंगेश झिने, भाजप अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अकिलभाई इनामदार, दिलीप बोठे, राधाकिसन कुलट, जालिंदर कुलट, खंडू काळे, बाळासाहेब जाधव, दिनेश शेळके, रवींद्र डमढेरे, अमित जाधव, दिलीप पाचारणे, गणेश दरंदले, भैय्या शिंदे, भैय्या साळुंके, संदीप पाचारणे, सोहेल सय्यद, जब्बार शेख, अविनाश कुलट, राजू शेख, गहिनीनाथ वाघ यांच्यासह गावातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काँग्रेस व खा. राहुल गांधींच्या विरोधात शहर भाजपाचे दिल्लीगेट येथे 'आंदोलन'




शहर भाजप व युवा मोर्चाच्या वतीने दिल्लीगेट येथे काँग्रेस व खा. राहुल गांधींच्या विरोधात आंदोलन केले.

नगर – दिल्लीमध्ये काँग्रेस पक्षाने खा. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर केलेल्या आंदोलनाचा निषेध अहिल्यानगर शहर भाजप व युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आला. २२ जुलै रोजी सायंकाळी दिल्लीगेट येथे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात उपस्थित पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस व खा. राहुल गांधीच्या निषेधाचे फलक झळकावत अराजक व बेजबाबदार राजकारणाच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी केल्याने परिसर दणाणला.

अनिल मोहिते म्हणाले, विदेशी शक्तीचे बाहुले बनलेल्या काँग्रेस पक्षाने आता गलिच्छ राजकारण सुरु केले आहे. ग्लोबल फोर्सच्या माध्यमातून देशात अस्थिरता निर्माण करण्याचा जो प्रयत्न चालू आहे त्या कटात काँग्रेसचे नेते सहभागी झाले आहेत. संपूर्ण देशात झालेल्या सर्व निवडणुकांमध्ये नागरिकांनी काँग्रेसला नाकारले आहे. त्यांचे शल्य त्यांना असल्याने खा.राहुल गांधी यांनी देशाचे सक्षम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी आंदोलन केले. काँग्रेसने केलेल्या या आंदोलनाचा आम्ही निषेध करून काँग्रेसने जर पुन्हा अशी देश विरोधी भूमिका घेतली तर भाजपचे पदाधिकारी रस्त्यवर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा इशारा दिला.

युवा मोर्चाचे अध्यक्ष ऋद्रेश अंबाडे म्हणाले, युवकांची माथी भडकावून काँग्रेसचे नेते देशात अराजकता पसरावत आहेत. स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी खा.राहुल गांधी व त्यांचे नेते युवकांचा वापर करत आहेत. मात्र देशातील भाजपचे सरकार युवकांच्या उज्वल भवितव्यासाठी सक्षम असल्याने योग्य निर्णय घेईल.

उपमहापौर धनंजय जाधव, महिला आघडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे यांनीही काँग्रेसने युवकांच्या खांद्यावर बंदूक ठेवून घाणेरडे राजकारणाची सीमा ओलांडली असल्याचा मनोगतातून काँग्रेसचा निषेध केला. यावेळी सरचिटणीस अशोक गायकवाड, संजय गायकवाड, अनिल सबलोक, उदय अनभुले, बाबासाहेब सानप, कालिंदी केसकर, ज्योती दांडगे, गीता गिल्डा, मुकुल गंधे, महेश गुगळे, ज्ञानेश्वर धिरडे, सुरेखा जंगम, पूजा आहेर, महावीर कांकरिया, देवेंद्र दुधाले, पियुष जग्गी, ज्ञानेश्वर काळे, बाळासाहेब भुजबळ आदी उपस्थित होते.

## अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे रक्तदान शिबीर




स्व. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने प्रोफेसर कॉलनी चौक येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले.

नगर – महाराष्ट्राचे स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने प्रोफेसर कॉलनी चौक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली सामाजिक बांधिलकी जपली. यावेळी स्वर्गीय अजित पवार यांच्या कार्याचा, नेतृत्वाचा आणि जनतेप्रती असलेल्या समर्पणाचा गौरव करण्यात आला.

या शिबिराप्रसंगी स्नेहालयाचे संस्थापक गिरीश कुलकर्णी, जनकल्याण रक्तपेढीचे अध्यक्ष अभय मेस्त्री, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, बाळासाहेब पवार, निखिल वारे, महेश तवले, अजिंक्य बोरकर, सुनील त्रिंबके, महेश लोंढे, केशव नागरगोजे, रोहन सानप, पुष्कर कुलकर्णी, संजय मोरे, सतीश ढवण, योगेश ठुबे, धीरज उकिरडे, सचिन जगताप, स्वप्नील ढवण, महेश गलांडे, बाळासाहेब निकम, किरण बारस्कर, अजय दिघे, राहुल कातोरे, दिनेश खेडकर, अंकुश बोरुडे, संकेत कराड, प्रशांत निमसे, ज्ञानदेव अकोलकर, आनंद राठोड, अमित गटणे आदींसह नागरिक उपस्थित होते.

गिरीश कुलकर्णी म्हणाले, राज्याचे स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना आपल्यातून जाऊन काही महिने उलटले असले तरी त्यांच्या अकाली निधनाची हळहळ आजही प्रत्येकाच्या मनात कायम आहे. अतिशय संवेदनशील, शब्दाला, कामाला आणि वेळेला पक्के असलेले तसेच मंत्रिमंडळातील आपल्या खात्यावर संपूर्ण प्रभुत्व असलेले, महाराष्ट्राच्या समाजकारण, राजकारण आणि अर्थकारणाची सखोल जाण असलेले नेतृत्व म्हणजे स्वर्गीय अजित पवार होत. अहिल्यानगरमध्ये आमदार संग्राम जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक आणि पक्षाचे कार्यकर्ते त्यांच्या कार्यपरंपरेचा वारसा पुढे नेत असल्याचे दिसून येते. त्यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजाप्रती बांधिलकी जपली गेली असून हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले, राज्य शासनाने स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव देशातील महापुरुषांच्या यादीमध्ये समाविष्ट केले असून त्यानिमित्त शासकीय कार्यक्रमही पार पडले आहेत. जनतेच्या प्रश्नांसाठी अहोरात्र झटणारे, कर्तृत्ववान आणि लोकाभिमुख नेतृत्व आज आपल्यात नसले तरी त्यांचे विचार कायम प्रेरणा देणारे आहेत. स्वर्गीय अजित पवार यांच्या विचारांना अभिवादन म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून स्वर्गीय अजित पवार यांच्या स्मृतींना अभिवादन केले. सामाजिक उत्तरदायित्व जपत रक्तदानाच्या माध्यमातून अनेकांना नवजीवन देण्याचा संदेश देत हा उपक्रम संपन्न झाला.

## अहिल्यानगर शहरामध्ये २४ जुलै रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

नगर – नॅशनल करिअर सर्व्हिस (एनसीएस) पोर्टलच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त अहिल्यानगर येथे २४ जुलै रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात पाच आस्थापनांकडून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे उमेदवारांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार असून, नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे प्रभारी सहाय्यक आयुक्त योगेश उगले यांनी केले आहे.

केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयांतर्गत कार्यरत नॅशनल करिअर सर्व्हिस (एनसीएस) पोर्टलच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त २० ते २४ जुलै या कालावधीत 'एनसीएस पोर्टल लाँच वीक' साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, टी. व्ही. सेंटर, अहिल्यानगर येथे दि. २४ जुलै रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यात एच. एस. सोल्युशन प्रा. लि., साई इन्फोटेक, संत नागेबाबा मल्टीस्टेट को–ऑप क्रेडिट सोसायटी, जनराली सेंट्रल लाईफ इन्शुरन्स आणि मुथूट होम फायनान्स ही पाच आस्थापने सहभागी होणार आहेत. एचएससी, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अशा विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड करून नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी सेवायोजन नोंदणी केली नसल्यास www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. त्यानंतर लॉग–इन करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्त पदांसाठी अर्ज करावा. तसेच www.ncs.gov.in या संकेतस्थळावरही सहभाग नोंदवून प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी प्लेसमेंट ड्राईव्ह समन्वयक वसीमखान पठाण (मो. ९४०९५५५४६५) यांच्याशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांनी सहभाग नोंदवून या रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अनाहत एक कलासृष्टीच्यावतीने 'अभंगनाद' चे आयोजन; अभंग, भक्तीगीत,गजर, दिंडी,नृत्य यांचे होणार सादरीकरण



नगर – येथील अनाहत एक कलासृष्टी संस्थेच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त 'अभंगनाद' या अभंग आणि भक्ती गीतांच्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन आषाढी एकादशीच्या दिवशी २५ जुलै रोजी सायं. ६ ते ९ या वेळेत माऊली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात अहिल्यानगर येथील प्रथितयश कलाकार सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाची संकल्पना आणि दिग्दर्शन अखिल भारतीय नाट्य परिषदेचे उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रा. प्रसाद बेडेकर यांचे असून सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक अभिजित अपस्तंभ, ओंकार देऊळगावकर तसेच सुप्रसिद्ध गायिका सौ. अनुजा कुलकर्णी, सौ. अमृता बेडेकर, सौ. श्रेया सुवर्णपाठकी हे कलाकार आपली गायन सेवा सादर करणार असून त्यांना संवादिनी वर संकेत सुवर्णपाठकी तर तबल्यावर प्रसाद सुवर्णपाठकी, ॲड. आनंद कुलकर्णी, पखवाजावर सौरभ साठे, तालवाद्यावर शार्दूल खोल्लम हे साथसंगत करणार आहेत.

या कार्यक्रमात लोकप्रिय अभंग व भक्तीगीत,गजर, दिंडी याबरोबरच अभंग नृत्य यांचे सादरीकरण कु. वैष्णवी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सादर होणार आहे. तसेच यामध्ये नगर मधील विविध संगीत विद्यालयातील कला साधक आणि अनाहतचे सदस्य सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम विनामूल्य असून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य असून जास्तीत रसिकांनी रसिकांनी या मैफलीचा आस्वाद घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रसाद सुवर्णपाठकी व संदिप कुलकर्णी यांनी केले आहे.

## विठ्ठलनामाच्या गजरात केडगावच्या सरस्वती विद्यालयात रंगली पंढरीची वारी

**महाराष्ट्राची संतपरंपरा आणि संस्कृतीचे दर्शन, ७०० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**



केडगावच्या सरस्वती विद्यालयाच्या बाल वारकऱ्यांचा रंगलेला रिंगण सोहळा.

नगर – आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर केडगाव येथील सरस्वती प्राथमिक विद्या मंदिरात विठ्ठलनामाच्या अखंड गजरात, टाळ–मृदंगाच्या निनादात आणि भक्तीमय वातावरणात 'पंढरीची वारी, वृक्षदिंडी आणि शिक्षणाची वारी' हा आगळावेगळा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. बालवाडी ते दहावीपर्यंतच्या सुमारे ७०० विद्यार्थ्यांनी वारकरी बनत महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, संस्कारांचा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला.

विठ्ठल–रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, मुक्ताबाई, प्रभू श्रीराम, सीता, लक्ष्मण तसेच विविध संतांच्या वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात विणा, मुखी विठ्ठलनाम आणि पावलोपावली हरिनामाचा गजर अशा भक्तिरसात न्हालेल्या दिंडीने परिसर भक्तिमय बनला होता.

दिंडीतून झाडे लावा–झाडे जगवा,एक बाळ–एक झाड,पंढरीची वारी, वृक्षदिंडी आणि शिक्षणाची वारी अशा घोषणांद्वारे पर्यावरण संरक्षण, संस्कार आणि शिक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला. नागरिकांनी ठिकठिकाणी दिंडीचे पुष्पवृष्टी करून उत्स्फूर्त स्वागत केले.

सरस्वती विद्यालयातून निघालेली ही दिंडी मोहिनीनगर मार्गे केडगाव देवी प्रांगणात पोहोचली. तेथे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी फुगडीचा आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी आकर्षक रिंगण साकारत पर्यावरण संवर्धनाची गीते सादर केली. दिंडीच्या समारोपानंतर विद्यार्थ्यांनी 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. या दिंडी सोहळ्याप्रसंगी नगरसेवक मनोज कोतकर, नगरसेवक मयूर बांगरे, नगरसेविका कमलताई कोतकर, उद्योजक जालिंदर कोतकर, माजी नगरसेवक संभाजी पवार, मुख्याध्यापक संदीप भोर, प्रा.डॉ. रविंद्र चोभे, सहकार्यवाह डॉ. हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान प्रा डॉ दादासाहेब काजळे, अवि साठे, सुमन पाटील, सुमन कदम, सुमन गावडे, लंका आव्हाड, प्रियंका सातपुते, किसनाबाई बनकर, जयश्री काळे, यमुना अंकुश कोल्हे, रोहिणी राऊत, रोहिणी कांबळे आदींसह शिक्षक, पालक उपस्थित होते.

## अजित पवारांच्या जयंतीनिमित्त मनपाची विशेष स्वच्छता मोहीम



महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर मनपाच्या स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

नगर – महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त हुतात्मा स्मारक तसेच वीर भगतसिंग उद्यान परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याचबरोबर महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. विशेष म्हणजे महापौर ज्योतीताई गाडे यांनी स्वतः हातात खोरे, टिकाव आणि घमेले घेऊन स्वच्छता मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग नोंदवत नागरिकांमध्ये स्वच्छतेचा संदेश दिला. त्यांच्या सहभागामुळे या मोहिमेला विशेष उत्साह लाभला.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, माजी उपमहापौर गीतांजली काळे, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे, नगरसेवक मयूर बांगरे, सुमित लोंढे, जालिंदर कोतकर, महेंद्र कांबळे, यशवंत तोडमल, सचिन गाडे, शुभम पांडुळे, डॉ. गणेश निमसे, प्रदीप पवार तसेच न्यू आर्ट्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवत स्वच्छ, सुंदर आणि हरित अहिल्यानगर घडविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. स्वर्गीय अजितदादा पवार हे नेहमीच सुंदर, नियोजनबद्ध आणि विकासाभिमुख शहराची संकल्पना मांडत असत. नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा कायम प्रयत्न होता.

त्या पुढे म्हणाल्या की, त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी स्वच्छता मोहिमेसह महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षण, स्वच्छता आणि सामाजिक उत्तरदायित्व या तिन्ही गोष्टी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाच्या असून प्रत्येक नागरिकाने अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

स्वच्छता मोहिमेदरम्यान हुतात्मा स्मारक आणि वीर भगतसिंग उद्यान परिसराची साफसफाई करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन देण्यात आले. सामाजिक जाणीव, पर्यावरण संवर्धन आणि शिक्षणाचा संदेश देणारे हे उपक्रम स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त उत्साहात संपन्न झाले.

## जिल्ह्यात ४ ऑगस्टपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

नगर – सण, उत्सव, कार्यक्रम, मंत्रीमहोदय व इतर अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे तसेच जातीय संवेदनशील वातावरणाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा महसूल हद्दीत २२ जुलै ते ४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये प्रभारी अपर जिल्हादंडाधिकारी सुभाष दळवी यांनी हा प्रतिबंधात्मक आदेश पारित केला आहे.

या आदेशानुसार शस्त्रे, काठ्या, सोटे, तलवारी, भाले, सुरे, बंदुका तसेच शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच दगड, क्षेपणास्त्रे किंवा ती फेकण्यासाठी वापरावयाची साधने जवळ बाळगणे, तयार करणे अथवा जमा करणे, कोणत्याही व्यक्तींच्या आकृत्या किंवा प्रतिमांचे प्रदर्शन करणे तसेच दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ बाळगणे अथवा तयार करणे यावरही बंदी घालण्यात आली आहे.

याशिवाय जाहीरपणे घोषणा देणे, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे, ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक तसेच मानवी आवाजाचे वर्धन करणारी अथवा तो जसा आहे तसा ऐकविणारी उपकरणे वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. सभ्यता किंवा नीतिमत्तेला धक्का पोहोचेल अथवा सार्वजनिक शांतता धोक्यात येईल असे कृत्य करणे, आवेशपूर्ण भाषणे करणे, हावभाव करणे, सोंग आणणे तसेच चित्रे, चिन्हे किंवा इतर वस्तू तयार करणे अथवा त्यांचा प्रचार करणे यालाही प्रतिबंध करण्यात आला आहे. सार्वजनिक अथवा खाजगी ठिकाणी सभा घेणे, मिरवणुका काढणे, रस्ता रोको करणे तसेच पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे.

शासकीय सेवेतील कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक असलेल्या व्यक्ती तसेच शारीरिक दुर्बलतेमुळे लाठी किंवा काठी वापरणाऱ्या व्यक्तींना हे आदेश लागू राहणार नाहीत. तसेच अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, धार्मिक मिरवणुका, लग्नसमारंभ व लग्नाच्या मिरवणुकांना या आदेशातून वगळण्यात आले आहे.

संबंधित प्रभारी पोलीस निरीक्षक अथवा सहाय्यक पोलीस निरीक्षक यांची रीतसर परवानगी घेतलेल्या सभा व मिरवणुकांनाही या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

## अहिल्यानगरमध्ये कुराश खेळाचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर

नगर – कोल्हापूर येथे आगामी १ ऑगस्ट ते ४ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या सीनियर राज्यस्तरीय कुराश स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबीर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्हा कुराश असोसिएशनच्यावतीने २६ ते २९ जुलै या कालावधीत विनामुल्य प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबीर सिद्धीबाग ज्युडो–कुराश हॉल, तोफखाना रोड, अहिल्यानगर येथे होणार आहे. शिबिराच्या अधिक माहिती अहिल्यानगर जिल्हा कुराश असोसिएशनचे सचिव आदित्य धोपावकर यांच्याशी ८४४६८०८३२१ या नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन संघटनेच्यावतीने करण्यात आले आहे.

## बुऱ्हाणनगर योजनेतील सात गावांचा पाणीपुरवठा सुरळीत

नगर – बुऱ्हाणनगर (ता. नगर) योजनेतील सात गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा ४ जुलैपासून बंद होता. याबाबत माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांची भेट घेऊन हा प्रश्न मांडला. त्यांनी संबंधित प्रशासकीय यंत्रणांशी संपर्क साधून तातडीने हा प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश दिले. त्यामुळे ही समस्या सुटल्याची माहिती खारे कर्जुने गावचे उपसरपंच अंकुश शेळके पाटील यांनी दिली.

शेळके पुढे म्हणाले, कर्जुने खारे, हिंगणगाव, निमगाव घाणा, हमीदपूर, जखणगाव, खातगाव आणि टाकळी या गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारी लाईन विळद सर्कलजवळ सुरू असलेल्या रेल्वे बोगद्याच्या कामामुळे फुटली होती. त्यामुळे पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा बंद होता. याबाबत विखे पाटील यांची भेट घेऊन त्यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यांच्या सुचनेवरून तातडीने कार्यवाही करण्यात आली आणि पाणीपुरवठा सुरळीत चालू झाल्याचे शेळके म्हणाले. हा प्रश्न मार्गी लावण्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केल्याचे ते म्हणाले.

